**<u>सं.फौ.ख.क्र.१११९/२०२४</u>**
शासन–वि–परशुराम हिले.
नि.क्र.८ लगत.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी</u>**

मी याद्वारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,
नाव – नामदेव जाऊजी जोशी,
वय – ४२ वर्षे, व्यवसाय – पोलीस हवालदार,
राहणार– नेमणूक गट क्र. ५, एसआरपीएफ कॅम्प, ता. दौंड, जि. पुणे.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. पी. आधंळे यांच्यामार्फत शपथेवर सुरुः–</u>**

१. आरोपी माझे चुलत मेव्हुणे लागतात. दि. १६.०३.२०२४ रोजी काय घटना घडली याची मला व्यक्तीशः माहिती नाही. आरोपीकडून फायरींग झाल्याबाबत मला माहिती नाही. मी दौंड पोलीस स्टेशन येथे जाऊन फिर्याद दिली होती. आता मला दाखविण्यात आलेली फिर्यादवरील सही माझी आहे. त्यातील मजकूराबाबत मला माहिती नाही. फक्त सहीस **<u>नि. १४</u>** देण्यात येते. आता मला दाखविण्यात आलेली छापील खबर वरील सही माझी आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. फक्त सहीस **<u>नि. १५</u>** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास पाठिंबा देत नसल्याचे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी नमुद केले व साक्षीदारास उलटतपासणी सदृष्य प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. १६.०३.२०२४ रोजी मी माझ्या घरी असताना मला माझी बहिण आशाबाई जंगले हिचा फोन आला व सांगितले की, त्यांच्या दाजीच्या घरात फायरींग झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाजींच्या घरी गेल्यावर पाहिले की, आरोपी तिथे बसलेला होता आणि त्यांच्या पिस्तुलमधील एक गोळी फायर होऊन जमिनीवर पडलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यावेळी दाजींना विचारले असता त्यांनी दारु पिल्याचे मला संशय आला. हे म्हणणे खरे नाही की, दाजींनी सांगितले की, त्यांच्या निष्काळजीपणामुळे चुकून गोळी फायर झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सदरच्या घटनेबाबत सहाय्यक कमांडर सुरेश जाधव यांना कळविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी दौंड पोलीस स्टेशनला जाऊन घडलेल्या घटनेबाबत फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या फिर्यादीतील आधोरेकित भाग अ चा मजकूर मी सांगितल्याप्रमाणे पोलीसांनी नोंदवून घेतला होता व तो खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही कागदावर वाचूनच सही करतो. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीतील मजकूरदेखील मी वाचूनच सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा मेव्हुणा असल्यामुळे त्याला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम. जे. के. शेख यांनी नाकारला.**

श्रवणोत्तर स्विकृत.

समक्ष

Sd/-

**[ श्रीमती एस. ए. विराणी ]**

दिनांकः- १२.०६.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, दौंड, जि. पुणे.